शूर वृत्तीची मुलगी

तेहरानमधील कथा



लेखिका: रिटा जहानफोरझ, वाली मिन्तझी

शूर वृत्तीची मुलगी

मराठी अनुवाद: सुशील मेन्सन




तेहरान शहराच्या एका शांत गल्लीत *शिराझ* नावाची एक छोटी मुलगी राहात होती. शिराझच्या जन्माच्या वेळीच तिच्या आईचा मृत्यू झाला होता. त्यानंतर लगेच तिच्या वडिलांनी दुसरे लग्न केले. तिच्या नव्या आईची आधीपासूनच एक मुलगी होती. ती वयाने शिराझएवढीच होती. तिचे नाव होते *मोनिर*. दोन्ही मुली बहिणींसारख्या वाढल्या.


आरंभी सर्व ठीक चालले. सगळे आनंदाने एकत्र राहिले. शिराझची सावत्र आई तिच्याशी चांगली वागली. मग अचानक शिराझच्या वडिलांचा मृत्यू झाला आणि एका रात्रीत सगळे चित्र बदलले.

सावत्र आई म्हणाली, “तुझे वडील पैसे कमवत तोवर ठीक होतं, पण आता आपल्याला मोलकरणीचा खर्च परवडणार नाही. पैसे वाचवायला हवेत, शिराझ. आता घरातलं सगळं काम तुला करावं लागेल.”

शिराझजवळ आपल्या मित्रमंडळींना भेटायला, त्यांच्याशी बाहेर खेळायला वेळच राहिला नाही. तिचा दिवस स्वयंपाक, साफसफाई, धुणीभांडी, इस्त्री वगैरे कामातच संपू लागला. तिला आपल्या वडिलांची खूप आठवण येत असे. पण ते कधीच परतणार नाहीत, याची तिला जाणीव होती.








ही कहाणी सुरू होते, हिवाळ्यातील पानगळीच्या एका दिवशी. शिराझने आपली सारी कामे संपवली. तिने घराची साफसफाई केली, कपडे धुतले आणि इस्त्रीसुद्धा केले. फावल्या वेळात ती घराच्या वर असलेल्या बाल्कनीत जाऊन बसत असे. आपल्या मांडीवर लोकरीचा एक गुंडा ठेवत असे. तो गुंडा तिची आई तिच्यासाठी ठेवून गेली होती.

ती स्वत:साठी एक स्वेटर विणायला बसली. पण अचानकच हवेच्या एका झोताने लोकरीचा गुंडा तिच्या मांडीवरून उडून गेला आणि बाल्कनीपासून दूर अंतरावर जाऊन पडला.





शिराझ पटकन उठली आणि रेलिंगला पकडून खाली बघू लागली आणि तिच्या लोकरीच्या गुंड्याला शोधू लागली. हवेच्या झोताने उडून तो गुंडा शेजारच्या अंगणातील एका गुलाबाच्या झुडपात अडकलेला असल्याचे तिला दिसले.

“माझ्या आईची आठवण आहे तो गुंडा,” शिराझ स्वत:शी म्हणाली. “तो परत आणायला हवा.”



शिराझला कंप भरला, पण फक्त थंडीमुळे नाही. तिने आपल्या घरापासून शेजारच्या विचित्र बागेत जाणाऱ्या वाटेचे निरीक्षण केले आणि मग ती आपला लोकरीचा गुंडा आणायला निघाली.

तिने शेजारच्या घराचा दरवाजा जोराने ठोठावला. थोडा वेळ गेला, पण आतून काहीच हालचाल जाणवली नाही. तिने पुन्हा दार ठोठावले. खूप वेळानंतर, दरवाजावर असलेली एक छोटी खिडकी उघडली आणि डोळ्यांची एक जोडी तिला न्याहाळू लागली.

“काय पाहिजे तुला?” एक वृद्ध स्त्रीने विचारले.

“नमस्कार, माझं नाव शिराझ. माफ करा मला,” शिराझ घाबरत बोलली. “माझा लोकरीचा गुंडा तुमच्या बागेत येऊन पडलाय. मला द्याल का तो परत?”

वृद्धेने शिराझकडे संशयी नजरेने वरपासून खालपर्यंत पाहिले. “मी तुझा लोकरीचा गुंडा नक्की देईन. पण त्यासाठी तुला माझी काही कामं करावी लागतील, मला झेपत नाहीत अशी कामं. मग देईन मी तुला तुझा गुंडा,” वृद्धा म्हणाली.

“आवडेल मला काम करायला,” शिराझ उत्तरली. तिला कष्टाची चांगलीच सवय होती. तिला फक्त तिचा लोकरीचा गुंडा परत हवा होता.



कर्रss आवाज करत दरवाजा उघडला. शिराझला समोर विस्कटलेले, धुळकट लांब केस असलेली म्हातारी बाई दिसली. तिने आपला चेहरा धुतला नव्हता, तिचे कपडे गलिच्छ होते, तिची नखे लांब आणि वाकलेली होती. शिराझचे हृदय वेगाने धडधडू लागले. ती तिथून पळून जायचा विचार करू लागली. पण ती जागेवरच स्तब्ध होऊन उभी राहिली. “या म्हाताऱ्या बाईचे डोळे दयाळू वाटतात,” शिराझ स्वतःशी म्हणाली. “ती भीतीदायक दिसते, पण मला वाटतं की ती स्वतःला नीटनेटकं ठेवत नसावी.”

“आत येतेयस की नाही?” वृद्धेने अधीरपणे विचारले. शिराझने सावकाश घरात प्रवेश केला.






घरात खूप दुर्गंध होता, अस्वच्छपणा होता. वृद्धेने तिला स्वयंपाकघर दाखवले. तिथे खरकटे लागलेल्या थाळ्या, ताट, वाट्या, कढई वगैरे भांड्यांचा ढीग होता. वृद्धेने शिराझला एक वजनदार हातोडा दिला.

“ही सगळी भांडी या हातोड्याने फोडून टाक. सगळं काही तोडायचं,” असे म्हणत वृद्धा निघून गेली.

शिराझने सभोवती बघितले आणि हातोडा कोपऱ्यातील एका स्टुलावर ठेवून दिला.

मग ती कामाला लागली. तिने सगळी भांडीकुंडी धुतली, मोरी स्वच्छ केली, फरशी पुसून काढली. तिला फडताळात भाज्या दिसल्या. तिने एका भांड्यात पाणी घेतले, चूल पेटवून त्यावर ते ठेवले आणि भाज्यांचे सूप बनवले.

स्वयंपाकघराची साफसफाई झाल्यावर, भांडी नीटनेटकी लावल्यावर ती वृद्ध स्त्रीला शोधू लागली. “मी सगळं काम करून ठेवलंय,” ती वृद्धेला म्हणाली. वृद्धेने काहीही न बोलता स्वयंपाकघर बारकाईने न्याहाळले.






मग वृद्ध स्त्रीने शिराझला बागेत नेले. तिथे झाडझुडपांमध्ये, फुलांमध्ये रानटी गवत उंच वाढले होते, तण उगवले होते. तेथील माती सुकली होती, तिला भेगा पडल्या होत्या. वृद्धेने शिराझला एक वजनदार कात्री दिली. “सगळी फुलं कापून टाक आणि रोपटी मुळापासून उखडून टाक. झुडपंसुद्धा कापून टाक. सगळं नष्ट करून टाक. मला इथे काहीही नकोय,” असे म्हणत वृद्ध स्त्री घरात गेली.



शिराझने मलूल पडलेल्या बागेकडे एकदा पाहिले. मग ती कामाला लागली. तिने रोपट्यांची काटछाट केली, तण उपटून काढले आणि झुडपांची कापाकापी केली. काम करत असताना तिला थेंबांचा टपटप आवाज ऐकू आला. तिला झाडाझुडपांमध्ये एक खडक दिसला. तो ताज्या पाण्याने भिजून गेला होता. “या खडकाखाली नक्कीच एखादा झरा असणार. हा खडक हटवला तर तो झरा बागेला पाणी पुरवेल,” तिच्या मनात आले. खडक खूप वजनदार होता. पण तो हटवण्यात शिराझला यश मिळाले. झऱ्याच्या पाण्याने झाडाझुडपांमधून, फुला-गवतांमधून वाट काढली. मग तहानलेली रोपटी पुन्हा टवटवीत आणि हिरवीशार दिसू लागली.

शिराझने वृद्ध स्त्रीस बोलावून आणले. “मी बागेची साफसफाई केलीय,” ती म्हणाली. वृद्ध स्त्रीने शिराझने केलेले काम न्याहाळले, पण त्याबद्दल ती चकार अक्षर बोलली नाही.





यानंतर, वृद्धा शिराझला आपल्या खोलीत घेऊन गेली. “आणखी एक काम कर. ही कात्री घे आणि माझे सगळे केस कापून टाक. मला आता इतके लांब केस नको वाटतायत,” वृद्धा म्हणाली.

शिराझने वृद्धेचे विस्कटलेले, गुंतलेले केस पाहिले. तिने आधी ते धुतले. त्यामुळे केस चमकू लागले, रुपेरी दिसू लागले. मग शिराझला एक कंगवा मिळाला. तिन वृद्धेचे केस विंचरले आणि एकत्र बांधून टाकले.





आता घर अगदी शांत आणि स्वच्छ दिसत होते. वृद्ध स्त्री आनंदली. “हा घे तुझा लोकरीचा गुंडा. तू केलेल्या कामासाठी तुझे खूप खूप आभार. आता मागल्या दाराने जा. तिथे तुला दोन तलाव दिसतील. एकात स्वच्छ पाणी असेल आणि दुसऱ्यात गढूळ पाणी. आधी स्वच्छ पाण्याच्या तलावात जा. त्यात तीन वेळा डुबक्या मार. मग गढूळ पाण्याच्या तलावात स्नान कर. त्यातसुद्धा तीन डुबक्या मार. नंतर तू आपल्या घरी जाऊ शकतेस.”

शिराझने वृद्धेचे आभार मानले. लोकरीचा गुंडा घेऊन ती मागल्या दाराने बाहेर पडली. वृद्धेने सांगितल्यानुसार, तिला दोन वर्तुळाकार तलाव दिसले. शिराझने प्रत्येकी तीनवेळा स्वच्छ पाण्यात आणि मग गढूळ पाण्यात डुबक्या मारल्या. त्यानंतर ती घरी गेली.



शिराझने आपल्या घराचे दार ठोठावले. पण तात्काळ तिला आठवले की आपण न सांगता घराबाहेर गेलो होतो आणि घरी स्वयंपाक करायचा राहून गेला होता. “अरे बापरे, मोठीच अडचण झाली सगळ्यांची,” तिच्या मनात आले. तिची सावत्र आई दरवाजा उघडेपर्यंत शिराझ भीतीने थरथर कापू लागली. आपल्याला कडक शिक्षा मिळणार, हे ती जाणत होती.

पण दरवाजावर आली, शिराझची बहीण मोनिर. तिने मंद स्मित केले आणि विनम्रपणे विचारले, “काय मदत करू शकते मी तुला?””

“मला उशीरच झाला, माफ करा,” शिराझ म्हणाली.

“तूच माफ करा मला. तू आहेस तरी कोण?” मोनिरने विचारले.

शिराझ गोंधळली. “अग, मी शिराझ. माफ कर उशीर केल्याबद्दल,” ती म्हणाली.

मोनिर हसू लागली. “तू शिराझ कशी असू शकशील?” ती म्हणाली. “तू अजिबात तिच्यासारखी दिसत नाहीस. तू तर खूप सुंदर दिसतेस!”

“कृपा करून चिडवू नकोस मला. मला आत घे, नाहीतर तुझी आई रागवेल.”

मोनिर वळली आणि तिने आपल्या आईला हाक मारली.

शिराझची सावत्र आई दारात आली. “काय मदत करू मी तुला?” तिने विनम्रपणे शिराझला विचारले.

“कृपा करून मला आणखी खिजवू नका. मी सगळं काही समजावते तुम्हाला....पण आधी मला घरात घ्या,” शिराझ काकुळतीला आली.

शेवटी मोनिर आणि तिच्या आईला जाणवले की ती सुंदर तरुणी शिराझच होती. मग त्यांनी शिराझला भरपूर प्रश्न विचारले. “कुठे होतीस तू? इतकी सुंदर कशी बनलीस?” शिराझने सगळी कहाणी सांगितली.







पुढल्या दिवशी शिराझची सावत्र आई बाजारात गेली आणि दोन पिशव्या भरून लोकर घेऊन परतली. शिराझने तिला त्या वृद्ध स्त्रीची बाग दाखवली. सावत्र आईने लोकरीचे गुंडे इथेतिथे भिरकावले. एक गुंडा खुल्या खिडकीतून बाहेर पडला आणि डाळीच्या वाडग्यात जाऊन पडला. दुसरा गुंडा फुटबॉलच्या मैदानात जाऊन पडला आणि एका झाडाच्या फांदीत जाऊन अडकला. एक गुंडा रस्त्यावर चालणाऱ्या एका माणसाच्या डोक्याला जाऊन लागला.

अखेरीस, एक गुंडा वृद्ध स्त्रीच्या बागेत जाऊन पडला. “हा बरोब्बर पडला!” सावत्र आई उत्साहाने मोनिरला म्हणाली.





“आता तू जा तिथे, मोनिर!” सावत्र आई म्हणाली. “तुला सांगितलं तसं कर. आळशीपणा, उद्धटपणा करू नकोस. परतताना तलावात डुबकी मारायला विसरू नकोस. तलावाच्या पाण्यात नक्कीच काही जादू असणार.” मग आई एका झाडामागे लपली. मोनिरने वृद्ध स्त्रीचा दरवाजा ठोठावला.

“चल, लवकर दार उघड, म्हातारे!” मोनिर पुटपुटली. तिने पुन्हा दार ठोठावले.

खूप वेळानंतर, एक छोटीशी खिडकी उघडली आणि डोळ्यांची एक जोडी तिला न्याहाळू लागली.

“काय हवंय तुला?” वृद्धेने विचारले.

“माझा लोकरीचा गुंडा तुझ्या बागेत पडलाय. मला परत हवाय तो,” मोनिर म्हणाली.

“आधी माझी काही कामं करावी लागतील तुला,” वृद्धा म्हणाली.

“ठीकाय, ठीकाय,” अधीर होऊन मोनिरने मान्य केले.

दरवाजा उघडला आणि मोनिरला समोर विस्कटलेल्या, गुंतलेल्या केसांची वृद्ध स्त्री दिसली. मोनिरने तिला मागे ढकलले. “काय कामं करून घ्यायचीयत माझ्याकडून तुला?” तिने विचारले. वृद्धेने तिला तिचे अस्ताव्यस्त स्वयंपाकघर दाखवले आणि तिच्या हातात एक वजनदार हातोडा दिला.

वृद्ध स्त्री म्हणाली, “सगळी भींडीकुंडी आणि मोरी तोडून-फोडून टाक.”

मोनिर तात्काळ कामाला लागली. तिने हातोड्यावरील आपल्या हातांची पकड घट्ट केली आणि सगळे काही तोडून-फोडून टाकले. आपले काम संपवून ती वृद्धेला म्हणाली, “मी सगळं काम करू टाकलंय.”


वृद्ध स्त्रीने काहीही न बोलता स्वयंपाकघर बारकाईने न्याहाळले.





मग वृद्ध स्त्रीने मोनिरला बागेत नेले. तेथील झाडेझुडपे अवाजवी वाढली होती, फूले कोमेजली होती आणि सर्वत्र तण माजले होते. वृद्धा म्हणाली, “सगळी फुलं कापून टाक. इथे एकही फूल दिसता कामा नये,” असे म्हणत वृद्ध स्त्रीने मोनिरला एक वजनदार कात्री दिली.

मोनिरने लगेच आपले काम सुरू केले. तिने फुले, झाडी आणि दोन वृक्षसुद्धा कापून टाकले. आता बागेत एकही रोपटे उरले नाही. सगळी बाग उध्वस्त झाली. मग मोनिर वृद्ध स्त्रीला शोधू लागली. “बागेचं कामसुद्धा मी पूर्ण केलंय,” मोनिर तिला म्हणाली. वृद्ध स्त्रीने बागेला बारकाईने न्याहाळले, पण ती एकही शब्द बोलली नाही.



शेवटी वृद्ध स्त्रीने मोनिरला आपल्या खोलीत नेले. “आणखी एक काम करावं लागेल तुला. तुला तुझा लोकरीचा गुंडा परत हवा असेल तर ही कात्री घे आणि माझे सगळे केस कापून टाक.”

मोनिरने वृद्धेचे केस घाईघाईत कसेतरी कापून टाकले. काम संपल्यावर तिने अधीरपणे विचारले, “तलावात डुबक्या कधी मारायच्या?” वृद्धने स्वत:ला आरशात निरखून केस किती छोटे केले हे पाहिले. फारच बेफिकीरपणे कापले होते ते.

“हो, आता तू मागल्या दाराने बाहेर पड. तुला दोन तलाव दिसतील. एकात स्वच्छ पाणी असेल आणि दुसऱ्यात गढूळ. आधी गढूळ पाण्यात तीन डुबक्या मार. मग स्वच्छ पाण्यात तीन डुबक्या मार,” वृद्ध स्त्रीने मोनिरला सांगितले. “नंतर तू आपल्या घरी जा.”






मोनिर मागल्या दाराकडे पळाली. ती वृद्ध स्त्रीने तिला परत केलेल्या लोकरीचा गुंड्यालाही विसरून गेली. दोन तलाव दिसताच तिने आधी गढूळ पाण्यात तीन डुबक्या मारल्या आणि मग स्वच्छ पाण्यात तीन डुबक्या मारल्या. “मी शिराझपेक्षा जास्त वेळ पाण्यात राहाणार,” मोनिर पुटपुटली. “मग मी शिराझपेक्षा जास्त सुंदर दिसेन!”

सूर्यास्त होत आला. मोनिर अजूनही पाण्यातच होती. तिच्या त्वचेवर सुरकुत्या पडल्या आणि ती थंडीने कापू लागली. शेवटी ती कशीबशी बाहेर आली आणि आपल्या घराकडे धावली.





मोनिरने आपल्या घराचा दरवाजा ठोठावला. आपण खूप सुंदर दिसत आहोत, आपल्याला पाहून आईला खूप आनंद होईल वगैरे विचार तिच्या मनात आले.

पण तिची आई दारात आली तेव्हा म्हणाली, “आम्ही भिकाऱ्यांसाठी दरवाजा उघडत नाही.” आईने मोनिरच्या तोंडावर दरवाजा धाडकन बंद केला.



मोनिरने पुन्हा प्रयत्न केले.

“मला त्रास देणं बंद कर, भिकारडे,” आई ओरडली.

“आई, मी मोनिर,” मोनिर म्हणाली.

शेवटी मोनिरच्या आईला जाणवले की खरंच दारात मोनिरच उभी होती. ती खूप विद्रुप दिसत होती. तिचे केस तिच्या कानांच्या भोवताली लटकत होते, तिचे डोळे निस्तेज झाले होते, तिची त्वचा खडबडीत झाली होती. “हे काय झालं?” आई शिराझवर ओरडली. “तू त्या म्हातारीच्या घरून इतकी सुंदर होऊन परतलीस, मग मोनिर इतकी कुरूप होऊन कशी आली?”

“मी....मला नाही माहीत....” शिराझ आपल्या बहिणीला निरखू लागली. बहिणीची अवस्था पाहून ती अवाक झाली होती.

“तू त्या म्हातारीकडे काय काय झालं हे सगळं सांगितलं नाहीस मला?” आई ओरडली.


“मी सगळं सांगितलं होतं तुम्हाला,” शिराझ उत्तरली.

“आणि तू मोनिर? हिने जे जे सांगितले तसंच केलंस की नाहीस तू?” आईने विचारले.

“हो आई, मी अगदी तेच केलं जे त्या म्हातारीने करायला सांगितलं. तिने मला स्वयंपाकघर तोडूनफोडून टाकायला सांगितलं, मी ते तोडून टाकलं. तिने मला बाग उद्ध्वस्त करायला सांगितली, मी सगळी रोपटी, झुडपं उखडून काढली. तिने मला तिचे केस कापायला सांगितले, मी ते कापून टाकले.” “

घरात नीरव शांतता पसरली.





"माफ करा मला," शिराझ पुटपुटली.

"कशासाठी माफी मागतेयस?" सावत्र आईने विचारले.

"मोनिरची अवस्था बघून मला खूप दु:ख होतंय," शिराझ म्हणाली.

"तू तिथे काय वेगळं केलंस?" सावत्र आई आणि मोनिर एकदमच ओरडले.

शिराझला वृद्ध स्त्रीच्या घरातील दुपार आठवली. तिने स्वयंपाकघराची साफसफाई केली होती, भांडीकुंडी धुतली होती, सूप बनवले होते, बाग स्वच्छ केली होती, झाडांना पाणी घातले होते आणि वृद्धेचे रुपेरी केस विंचरले होते.

शेवटी शिराझ उत्तरली, "वृद्ध स्त्रीने मला सगळं काही नष्ट करायला सांगतलं होतं, पण मी तसं केलं नाही. मी तिचं मन ओळखलं आणि तेच केलं जे तिला खरोखरच हवं होतं."



बरीच वर्षे निघून गेली. शिराझ आणि मोनिर मोठ्या झाल्या. लोकांना ती दडलेली बाग सापडली. त्यातील झाडाझुडपांची अवाजवी वाढ झाली होती. लोकांना दोन तलावही सापडले. त्यांनी त्यात पोहायचा प्रयत्न केला. मग त्यांना वृद्ध स्त्रीच्या चमत्काराचे गुपीतही सापडले.

स्वच्छ पाण्याचा तलाव आणि गढूळ पाण्याचा तलाव यांच्यात सारखेच पाणी होते. जे लोक त्यात डुबक्या मारतात त्यांच्यात ते बदल करत नाहीत. लोक आतून स्वत:ला जसे ओळखतात तेच रूप ते तलाव त्यांना दाखवतात.

सर्व लोकांनी शिराझचीही आठवण काढली. ती एक शूर वृत्तीची मुलगी होती. दु:खात असताना काही लोक आपल्याला काय हवं आहे, हे नेमकेपणाने सांगू शकत नाहीत, हे शिराझला उमगले होते.

समाप्त